**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:16.05.2025** **वार:शुक्रवार**

---

1. विधीमंडळाच्या विधेयकांवर राज्यपालांना निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा निश्चित करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे का-राष्ट्रपतींची सर्वोच्च न्यायालयाकडे विचारणा
2. पाकिस्तानकडे असलेली अण्वस्त्रं आंतरराष्ट्रीय अणु ऊर्जा संस्थेने आपल्या ताब्यात घ्यावीत-संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांचं प्रतिपादन
3. राष्ट्र प्रथम ही भूमिका घेत पाकिस्तान आणि तुर्कीए विरोधात भूमिका घेणाऱ्या व्यापाऱ्यांचं मुख्यमंत्र्यांकडून कौतुक
4. महानगरपालिका निवडणुका वेळेत घेण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न; या निवडणुका महायुती एकत्रच लढणार असल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती आणि
5. खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला 158 पदकांसह सलग तिसऱ्या वर्षी विजेतेपद

**राष्ट्रपती-सर्वोच्च न्यायालय**

राज्य विधीमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकांवर कार्यवाही करण्यासाठी राज्यपालांना कालमर्यादा देण्याचा अधिकार न्यायालयाला आहे का, अशी विचारणा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केली आहे. तामिळनाडू विधेयक प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायालयाकडे या संदर्भात विचारणा केली आहे. राष्ट्रपती मुर्मू यांनी 14 प्रश्नांवर न्यायालयाचं मत मागितलं आहे. विधेयकं निर्धारित वेळेत मंजूर झाली नाहीत, तर ती मंजूर झाली असं मानलं जाईल, या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशावर राष्ट्रपती मुर्मू यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. अशा प्रकारे संमती गृहीत धरण्याची संकल्पना संविधानाशी विसंगत असून ती राष्ट्रपती आणि राज्यपालांच्या अधिकारांना मर्यादित करत असल्याचं मुर्मू यांनी म्हटलं आहे.

**वक्फ सुनावणी**

वक्फ सुधारणा कायदा, 2025 च्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर येत्या 20 मे रोजी सुनावणी करणार असल्याचं काल सर्वोच्च न्यायालयानं सांगितलं. याचिकाकर्त्यांचे वकील कपिल सिब्बल आणि महाधिवक्ता तुषार मेहता यांनी 19 मेपर्यंत त्यांचं म्हणणं मांडावं, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठानं सांगितलं आहे.

**राजनाथ सिंह**

पाकिस्तानच्या हाती अण्वस्त्रे सुरक्षित नसून ती अण्वस्त्रे आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेने आपल्या देखरेखीखाली घ्यायला हवीत, असं ठाम प्रतिपादन संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी केलं आहे. त्यांनी काल जम्मू-काश्मीरमध्ये लष्कराच्या 15व्या कॉर्प्स बदामी बाग छावणीत जवानांना संबोधित केलं. ऑपरेशन सिंदूर राबवताना भारतीय सशस्त्र दलांनी दाखवलेल्या शौर्याचं त्यांनी कौतुक केलं. ऑपरेशन सिंदूर हे केवळ नाव नसून ती आपली देशाच्या संरक्षणाप्रति असलेली वचनबद्धता आहे, असं सांगताना राजनाथ सिंह म्हणाले…

**ऑपरेशन सिंदूर की कामयाबी ने पाकिस्तान में छिपे आतंकी संगठनों और उनके आकाओं को भी यह साफ़ बता दिया है कि वो कहीं भी अपने आप को महफ़ूज़ और सुरक्षित न समझें। अब वे भारतीय सेनाओं के निशाने पर हैं। दुनिया**

**जानती है, हमारी सेनाओं का निशाना अचूक है और वो जब वो निशाना लगाते हैं तो गिनती करने का काम दुश्मनों पर छोड़ देते हैं।**

**बहिष्कार पुणे**

राष्ट्र प्रथम ही भूमिका घेत पाकिस्तान आणि तुर्कीए विरोधात ठामपणे उभ्या ठाकलेले पुण्यातील व्यापारी, अभिनंदनास पात्र आहेत, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावाच्या काळात तुर्कीएनं पाकिस्तानला समर्थन दिल्यानंतर पुण्यातील व्यापाऱ्यांनी तुर्कीएच्या सफरचंदांवर तसंच सुक्या मेव्यावर बहिष्कार टाकला असून अनेक व्यापाऱ्यांना धमक्या येत आहेत. त्या पार्श्वभूमीवर माध्यमांशी बोलताना फडणवीस म्हणाले......

**पहिल्यांदा तर नेशन फ़स्ट भूमिका ज्या व्यापारांनी स्विकारली, त्यांचे मनापासन अभिनंदन करतो, कारण हा केवळ भारतियान वर हल्ला नव्हता, पहलगामला झालेला हल्ला होता, हा मानवतेवर झालेला हल्ला होता. अशा मानवतेच्या हल्लेखोरांना मदद करणाऱ्यांना नाकारणारे, आमचे व्यापारी अभिनंदनास पात्र आहेत. त्यांनी काळजी करण्याची गरज नाही, पाकिस्तानात घुसुन पाकिस्तान उद्वस्त करणारा हा भारत आहे. आणि आता तर न्यूयॉर्क टाइम्स ने सॅटेलाईट इमेजसहीत पाकिस्तान चे सत्य बाहेर काढलेले आहे,भारताला नख ही ते लावू शकलेले नाहीत, पण त्यांना कसें आम्ही उध्वस्त केलं.त्यामुळे कोणाच्याही पोकळ धमक्यांना भीक घालण्याची आवश्यकता नाहीये, सगळ्यांना आम्ही प्रोटेक्शन देऊ, नेशन फ़स्ट या भुमिकेवर सगळ्यांनी अडीग राहावे.**

**निवडणूक**

राज्यभरातील महापालिका निवडणुका वेळेवर आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार होतील असंही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात पत्रकारांशी बोलताना सांगितलं. या निवडणुका महायुती एकत्र लढवेल असंही फडणवीस म्हणाले.

**मुख्यमंत्री**

शहरं ही विकासाची केंद्र असल्यानं शहरांच्या विकासाला केंद्र आणि राज्य सरकारचं प्राधान्य देत आहे; गेल्या 10 वर्षात नागरीकरणासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यात आली आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात केलं. राज्यातील महानगरपालिका आयुक्त आणि नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्यासाठी यशदा इथं आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. उपमुख्यमंत्री आणि नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समस्या जाणून घेण्यासाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरेल असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. सांडपाणी व्यवस्थापन, प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर, वेस्ट टू एनर्जीसारखे उपक्रम, उत्तम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था राबवून शहरं अधिक सुंदर करता येतील, असंही शिंदे म्हणाले.

**वृद्धाश्रम**

रत्नागिरी जिल्ह्याच्या मंडणगड तालुक्यातल्या टाकेडे या गावात 'हॅबिटॅट फॉर ह्युमन फाउंडेशन'तर्फे उभारण्यात आलेल्या मिलन वृद्धाश्रमाचं उद्घाटनही काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं.

**सैनिक रॅली-नगर**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारताच्या वीर जवानांना मानवंदना देण्यासाठी भारतीय जनता पक्षानं देशभर तिरंगा यात्रेचं आयोजन केलं आहे. येत्या 23 मेपर्यंत ही तिरंगा यात्रा देशभर सुरू राहणार आहे. ठाणे, तसंच अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव, बीड जिल्ह्यात अंबाजोगाई आणि परळी इथं तिरंगा यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अकोला इथं आयोजित तिरंगा यात्रेतील एका नागरिकाची ही प्रातिनिधिक प्रतिक्रिया.....

**अकोल्यामध्ये ज्या देशाचं युद्धामध्ये पाकिस्तानने माघार घेतला आणि पाकिस्तानला त्याची जागा दिसली त्या आनंद साजरा करण्यासाठी आज अकोल्यामध्ये महायुतीच्या माध्यमातून तिरंगा रॅली काढून जल्लोष साजरा करून एक वंदना सर्व सैनिकांना सर्व जे शहीद झाले आहेत त्यांना आणि पुलवामा हल्यामध्ये ज्यांचाही दुर्दैवी मृत्यू झाला. या सगळ्यांना एक मानवंदनाबरोबर ही तिरंगा रॅली काढण्यात आली**

**विमानतळ**

कोल्हापूर-नागपूर विमान सेवेचा प्रारंभ केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते काल झाला. कोल्हापूर विमानतळावर नव्याने उभारलेल्या सुसज्ज एटीसी टॉवर आणि अन्य सुविधांचं उद्घाटनही मोहोळ यांच्या हस्ते झालं. कोल्हापूर विमानतळाला 'छत्रपती राजाराम महाराज' यांचं नाव द्यावं, ही कोल्हापूरकरांची मागणी आहे; याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे आला असून, मंत्रिमंडळात त्याला मंजुरी मिळावी यासाठी प्रयत्नशील असल्याचं मोहोळ यांनी सांगितलं.

**एस.टी**

प्रवाशांना सुरक्षित प्रवासाबरोबरच वेळेत बस सेवा देण्यासाठी राज्य परिवहन महामंडळ, अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या "स्मार्ट बसेस" घेणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री आणि एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. यासंदर्भात आयोजित बैठकीत ते काल बोलत होते. सर्व बसेसमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानावर आधारित कॅमेरे, जी.पी.एस. तंत्रज्ञान, दूरचित्रवाणीसंच, वाय-फाय, आग प्रतिबंधक यंत्रणा लावण्यात येणार आहे, या बसेस प्रवाशांसाठी अधिक सुरक्षित आणि आरामदायी असतील असं ते म्हणाले. स्वारगेट बसस्थानकावरील घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सुरक्षेला महत्त्व दिलं जाणार असल्याचंही सरनाईक यांनी सांगितलं.

**खेलो इंडिया**

बिहारमध्ये पार पडलेल्या सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेची काल सांगता झाली. यात महाराष्ट्राच्या संघाने सलग तिसऱ्यांदा अजिंक्यपद पटकावलं. केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खेडसे यांच्या हस्ते महाराष्ट्राला विजेतेपदाचा करंडक देऊन गौरवण्यात आलं. ऐकुया याबाबत अधिक वृत्तांत....

**खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत गतविजेत्या महाराष्ट्राने स्पर्धेच्या पहिल्या दिवसापासूनच आपला दबदबा निर्माण केला. विविध क्रीडा प्रकारात 58 सुवर्ण, 47 रौप्य, 53 कास्य अशी एकंदर 158 पदकांची लयलूट करीत महाराष्ट्राने आपले निर्विवाद वर्चस्व कायम राखले. खेळाडूंच्या जिद्दीच्या, संघर्षाच्या कामगिरीने स्पर्धेला अधिक झळाळी मिळाली. स्पर्धेतील 27 पैकी 22 क्रीडा प्रकारांमध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. ॲथलेटिक्समध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक 10 सुवर्णपदकांना गवसणी घातली, तर जलतरणात 7 सुवर्ण पदकांसह 29 पदकं कमवली. जिम्नॅस्टिक्समध्ये 6, धनुर्विद्येत 6, भारोत्तोलनात 5 सुवर्णपदके महाराष्ट्राने पटकावली. कुस्ती, सायकलिंग, नेमबाजीत महाराष्ट्राने सुवर्ण चौकार झळकविला. गटका, रग्बी या खेळातही महाराष्ट्र चमकला. स्पर्धत 437 खेळाडूंसह 128 प्रशिक्षक, व्यवस्थापक असे एकूण 565 जणांचे पथक सहभागी झाले होते. खेलो इंडियाच्या इतिहासात प्रथमच महाराष्ट्राच्या नऊ खेळाडूंनी विक्रम प्रस्थापित केले. महाराष्ट्राने मिळवलेलं हे केवळ अजिंक्यपद नाही तर मराठी मातीत रुजणारी क्रीडा संस्कृती आणि खेळाडूंच्या अथक परिश्रमाचं द्योतक आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी सीमा चोरडिया पुणे.**

**हवामान**

येत्या 2-3 दिवसात राज्याच्या सर्वच विभागांमध्ये तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.